**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक 01/10/2025**

**आरोपी लोकसेवक** - 1) श्री सुरेश दादाराव जाधव, वय 54 वर्षे, पद - राज्य कर अधिकारी ( वर्ग-2 ) व्यवसाय कर कार्यालय GST भवन रेल्वे स्टेशन समोर ता.जि. छत्रपती संभाजीनगर 2) श्री दुर्गादास धोंडीराम जाधव, वय 39 वर्षे, पद - कर सहाय्यक, ( वर्ग-3 ) व्यवसाय कर कार्यालय GST भुवन रेल्वे स्टेशन समोर छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्या कडुन 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे वेदांतनगर, छत्रपती संभाजीनगर (शहर) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | 1) श्री सुरेश दादाराव जाधव, वय 54 वर्षे, पद - राज्य कर अधिकारी ( वर्ग-2 ) व्यवसाय कर कार्यालय GST भवन रेल्वे स्टेशन समोर ता.जि. छत्रपती संभाजीनगर, रा. हनुमान नगर, गल्ली क्र. 01, संजय ढवळे यांच्या घरा जवळ, छत्रपती संभाजीनगर<br>2) श्री दुर्गादास धोंडीराम जाधव, वय 39 वर्षे, पद - कर सहाय्यक, ( वर्ग-3 ) व्यवसाय कर कार्यालय GST भवन रेल्वे स्टेशन समोर छत्रपती संभाजीनगर, रा. कोकणवाडी अहिल्याबाई होळकर चौक ज्ञनेश्वर नागरे यांच्या घरा समोर, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री वाल्मिक कोरे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे व त्यांचे मित्र यांनी दिवाळी सणासाठी दरवर्षी प्रमाणे फटाक्याची स्टॉल लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय कर कार्यालय छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन समोर गेले असता त्यांनी ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शासकीय चलनाचा भरणा प्रत्येकी 1100/- रुपये प्रमाणे केला परंतु आलोसे राज्य व्यवसाय कर अधिकारी श्री सुरेश जाधव यांनी तक्रारदार यांच्याकडे शासकीय काम करुन देण्यासाठी पैश्याची मागणी केली होती तक्ररदार यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी आज रोजी दिनांक 01/10/2025 रोजी ला.प्र.वि.कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती |
| थोडक्यात माहिती | दिनांक 01/10/2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष पडताळणी केली असता आलोसे वनपाल श्री सुरेश जाधव आणि आलोसे श्री दुर्गादास धोंडीराम जाधव, यांनी तक्रारदार यांच्या कडे दिवाळी सणासाठी दरवर्षी प्रमाणे फटाक्याची स्टॉल लावण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) रुपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) स्वीकारण्याचे कबूल केले.<br>लाचमागणी पडताळणी नंतर पांच समक्ष महाराष्ट्र राज्य व्यवसाय कर कार्यालय छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन समोर या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे श्री सुरेश दादाराव जाधव व आलोसे श्री दुर्गादास धोंडीराम जाधव यांनी तक्रारदार यांच्या कडून फटाक्याची स्टॉल लावण्यासाठी शासकीय काम करुन देण्यासाठी पैश्याची मागणी करुन 7,500/- (सात हजार पाचशे रुपये) स्वीकारण्याचे कबूल केले. त्यावरुन ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे वेदांतनगर छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केलेली आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री वाल्मिक कोरे, तपास अधिकारी श्री योगेश शिंदे, पोलीस निरिक्षक, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ राजेंद्र जोशी, पोअ/ प्रकाश डोंगरदीवे, पोअ/अनवेज शेख, चालक पोअ/ सी. एन बागुल ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064


पोलीस उप अधीक्षक कार्यालय
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

सुरेश ह.नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर